6 JUN 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरणदिनी विद्यापीठात वृक्षारोपण

कोल्हापूर, ता. ५ : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात वृक्षारोपण केले. तसेच द कॉन्झर्वेशन फाऊंडेशन ऑफ इंडिया या संस्थेच्या वतीने विद्यापीठास पक्ष्यांसाठी घरटी व धान्य प्रदान केले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सुमारे तीस रोपे लावली. याच ठिकाणी द कॉन्झर्वेशन फाऊंडेशनच्या वतीने अध्यक्ष आशीष घेवडे यांनी परिसरातील पक्ष्यांसाठी साठ घरटी आणि धान्य कुलगुरू डॉ. शिंदे यांच्याकडे सोपविले. संस्थेच्या अभिनव उपक्रमाचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी कौतुक केले आणि पर्यावरणातील अत्यंत महत्त्वाच्या घटकाच्या संरक्षणासाठी उचललेले पाऊल महत्त्वाचे असल्याचे सांगितले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यापीठाच्या परिसरात ठिकठिकाणी ही घरटी त्यात धान्य ठेवून झाडांवर बसविली.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. गिरीश कुलकर्णी, एनएसएस समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, यांच्यासह विश्वजित सावंत, धैर्यशील पवार, मनीष घेवडे, शार्दुल गरगटे, यतीश शहा, आमीर शेख, आकाश गोगले, मितेष घेवडे, विशाल पाटील, रुची पेंडूरकर आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सोमवारी शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात द कॉन्झर्वेशन फाऊंडेशन ऑफ इंडिया या संस्थेच्या वतीने देण्यात आलेली पक्ष्यांची घरटी लावताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

6 JUN 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## एनएसएस शिबिर : स्वयंसेवकांना मदतकार्यासंदर्भात मार्गदर्शन

# 'आव्हान'मध्ये कुलगुरूंनी घेतले आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या 'आव्हान-२०१७' या राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरामध्ये कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी रविवारी विविध सत्रांत प्रात्यक्षिकांसह आपत्ती व्यवस्थापनाचे धडे घेतले.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी रविवारी संपूर्ण दिवस शिबिरार्थी विद्यार्थ्यांसमवेत आपत्ती व्यवस्थापनाचे धडे गिरविण्यात घालविला. आपत्ती व्यवस्थापन ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी असून, एकमेकांच्या मदतीला धावून जात असताना शास्त्रशुद्ध माहिती व सुविधांनी आपण सुसज्ज असले पाहिजे, यादृष्टीने कुलगुरु डॉ. शिंदे यांनी रविवारची सकाळ राजाराम तलावावर जल आपत्ती व्यवस्थापनाविषयी जाणून घेण्यात घालविली. तर सायंकाळी त्यांनी इमारतींवरुन आपद्ग्रस्तांची सुटका कशी करावी, हे सुद्धा जाणून घेतले. 'एनडीआरएफ'चे निरीक्षक एस. डी. इंगळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना त्यांनी विविध शंका विचारून त्यांचे निरसन करून घेतले. यावेळी 'एनएसएस'चे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एन. पी. सोनजे, आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात सुरु असलेल्या 'आव्हान' शिबिरात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी आपती व्यवस्थापनाचे धडे घेतले.

## 'एनडीआरएफ'कडून प्रशिक्षण

या शिबिरांतर्गत सहभागी स्वयंसेवकांना जल, भूमी व वायू यांच्या संदर्भातील कोणत्याही प्रकारची आपत्ती उद्भवली असता घ्यावयाची दक्षता आणि मदतकार्य याविषयी 'एनडीआरएफ'ची टीम सकाळी सात वाजल्यापासूनच प्रशिक्षण देत आहे. जलविषयक आपत्ती व्यवस्थापनाविषयी राजाराम तलाव येथे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले जात आहे. उपलब्ध साहित्याचा वापर करुन बचावकार्य कसे सुरक्षिततरीत्या पार पाडावे, तराफे कसे तयार करावेत, दोरांच्या सहायाने तात्पुरती जीवरक्षणाची सुविधा कशी उभारावी, या सर्वांचा या प्रशिक्षणात समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
06 JUN 2017
पुण्यनगरी

## विद्यापीठात सोहळा

शिवाजी विद्यापीठात मंगळवारी सकाळी ७.३० वाजता शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करण्यात येणार आहे. या सोहळ्यात 'आव्हान-२०१७' या शिबिरासाठी राज्यभरातून आलेल्या एनएसएसच्या सुमारे १२०० विद्यार्थ्यांतर्फे शिवाजी विद्यापीठासमोरील भव्य शिवपुतळ्यास अभिवादन करण्यात येणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 JUN 2017
लोकमत

## विद्यापीठात आज शिवराज्याभिषेक सोहळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'आव्हान' हे राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर सुरु आहे. याअंतर्गत आज, मंगळवारी सकाळी साडेसात वाजता शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जाणार आहे. त्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे १२०० स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
6 JUN 2017
सकाळ

# म्युझिओलॉजी प्रशिक्षण वर्गास प्रारंभ

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठातील प्रौढ आणि निरंतर शिक्षण, विस्तार कार्य विभाग, ग्रामीण राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनीतर्फे जुने कागदपत्र जपणूक, संवर्धन तसेच वस्तुसंग्रहालय व्यवस्थापन अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन झाले. उदयसिंह राजेयादव म्हणाले, ''आपली संस्कृती जगात श्रेष्ठ आहे. हे सिद्ध करायचे असेल तर ऐतिहासिक जुन्या कागदांचे जतन, संवर्धन महत्त्वाचे आहे. छत्रपती शिवराय, सिराज उद्दौला, टिपू सुलतान, महात्मा गांधी आदी महापुरुषांच्या अनेक महत्त्वाच्या वस्तू परदेशात आहेत. त्या परत आणणे आवश्यक आहे. जुन्या वस्तू, नाणी, कागदपत्रांचे जतन, संवर्धनाचे प्रशिक्षण या अभ्यासक्रमात दिले जाईल.'' चंद्रशेखर काटे, प्राची गोडबोले, संगीता खाडे, अक्षयकुमार भोसले, सुनील मोहिते उपस्थित होते. सौ. धर्माधिकारी यांनी आभार मानले.